## प्रकरण १ ले

## प्रास्ताविक

(१) प्रास्ताविक.

(२) हिन्दी भाषेचे महत्व.

(३) महाराष्ट्र व हिन्दी भाषा.

(४) हिन्दी भाषेच्या अभ्यासाचे महत्व.

(५) हिन्दी भाषेच्या अभ्यासाची गरज.

(६) संशोधनाचा विषय.

(७) संशोधनाची उद्दिष्टे.

(८) संशोधनाची व्याप्ती व मर्यादा.

# प्रकरण १ ले

## प्रा स्ता वि क

१.१ प्रास्ताविक -

मानव हा एक भाषिक प्राणी आहे. भाषा बोलणारा, भाषेचा व्यवहारात सर्वत्र उपयोग करणारा प्राणी आहे. अन्य प्राण्यांच्या वाटयाला न आलेली भाषाशक्तीची नैसर्गिक व जन्मप्राप्त देन माणसाला लाभलेली आहे. मानव व मानवेत्तर प्राणी यांच्यात क्षुधा, काम, भय, वात्सल्य निर्माण इ. अनेक समान सहज प्रवृत्ति आहेत. परंतु मानवेत्तर प्राण्यांना बोलता येत नाही. मानवी मूल मात्र वर्षाचे होत नाही तोच बोलू लागते. म्हणूनच माणसाच्या ठिकाणी विद्यमान असलेली ही भाषाशक्ती त्याला लाभलेली एक विशिष्ट प्रकारची सहजप्रवृत्ती होय. या सहजप्रवृत्तीच्या साहाय्याने मानवाने अनेक अडचणीवर मात करून जीवन संघर्षात विजय मिळविला आहे व आपला विकास करून घेतला आहे. आपले जीवन सुखी संपन्न व समृध्द करून घेतले आहे. विचारशक्ती, बुध्दीमत्ता, सामाजिकता, सुसंस्कृतता इ. त्याच्या सर्व गुणविशेषाचा आधार मनुष्याच्या अंगी असलेली भाषा शक्ती ही होय. या जगामध्ये भाषेमुळेच मनुष्याला श्रेष्ठत्व प्राप्त झाले आहे असे मानले जाते. तात्पर्य "भाषा म्हणजे मनुष्याने विचार विनिमयासाठी प्रतिकात्मक ध्वनीसमूहांची रूढ केलेली सुसंगत व सर्वमान्य व्यवस्था होय." १

१.२ हिंदी भाषेचे महत्व -

भारत हा एक असा देश आहे की ज्या ठिकाणी अनेक भाषा एकत्र नांदत आहेत. फार प्राचीनकाळी भारतात संस्कृत भाषा प्रामुख्याने विकसीत झालेली दिसून येते. त्यानंतर हळूहळू इतर भाषांचा विकासही या भूमीत होऊ लागला. उदा. अर्धमागधी, पाली, मराठी, कन्नड,

गुजराती, तेलगू इ. या भाषा वेगवेगळ्या प्रांतांत प्रांतिक भाषा म्हणून वापरल्या जात. भारतावर एकछत्री अम्मल प्रदीर्घकाळ पर्यंत केवळ इंग्रजी आमदानीतच स्थापन झाला. यापूर्वी प्रांताप्रांताची रचना संस्थानिकांच्या सैनिकी सामर्थ्यावर अवलंबून होती. इंग्रजानी आपल्या आधुनिक शास्त्रसामर्थ्याने व राजनितीने भारतातील अनेक संस्थाने खालसा केली. इंग्रजी आमदानीत भारतात राजभाषा म्हणून इंग्रजीचा वापर होऊ लागला. त्यामुळे इंग्रजी शिक्षणाला या देशात प्राधान्य देण्यात आले. हळूहळू इंग्रजी माध्यमाच्या शाळा निघू लागल्या. स्वाभाविकपणे इंग्रजीचा प्रसार व प्रचार सर्वत्र दूरवर होऊ लागला आणि इंग्रजी हीच शासनाची भाषा म्हणून आवश्यक मानली गेली. इंग्रजी राज्यात थोडे फार इंग्रजी शिकलेल्या भारतीयांना नौकऱ्या उपलब्ध होऊ लागल्या आणि स्वाभाविकच द्रव्यार्जनाचे साधन म्हणून इंग्रजी शिकणे लोक पसंद करु लागले. इंग्रजी ही जेत्यांची भाषा असल्याने तिला अनन्य साधारण महत्व प्राप्त झाले. आपल्या देशातील तत्कालीन विद्वानानीही इंग्रजीला "वाघिणीचे दूध" संबोधिले. असे असले तरी या वाघिणीच्या दुधाची गरज आम्हा भारतीयाना नाही असे बी. कृष्णस्वामी अय्यर आणि बाबू शारदचरण मित्र यांनी ठासून सांगितले. त्याच बरोबर हिंदी भाषेच्या शिक्षणाला प्राधान्य देण्याची गरज लक्षात घेऊन याच भाषेच्या प्रचाराला सुरवात केली. परंतु या इंग्रजी काळातच लॉर्ड मेकॉले हे भारतात आले व त्यांनी आपले शिक्षण विषयक "पाझर" सिध्दांताचे तत्व **(Education filter down wards.)** शिक्षणात आणण्याचा प्रयत्न केला. एकूण शिक्षण विषयक धोरण कांही तुटपुंज्या लोकांना शिक्षण देणे हेच होते. त्यामुळे इंग्रजी भाषा शिक्षणात आवश्यक मानली गेली. तरी तिचा प्रसार व प्रचार भारतासारख्या ७०% खेडयांच्या देशात केवळ पांढरपेशा समाजालाच झाला असे दिसून येते.

जगातील सर्व आधुनिक देशात जर्मन, जपान, इंग्लंड, रशिया याना त्यांच्या त्यांच्या भाषा आहेत. परंतु आपल्या देशाच्या कारभाराची भाषा

म्हणून कोणतीच भाषा विकसीत न झाल्याने ते स्थान घेणारी भाषा असावी असे म. गांधी म्हणत. लोकमान्य टिळकांनीही भाषेच्या संदर्भात अशाच प्रकारचे मत व्यक्त केले. "गांधीजीनी इंग्रजाना अहिंसक लढयाने जिंकण्यासाठी जी साधने वापरली त्यात हिंदी शिक्षण व हिंदी भाषेचा विकास हाही एक हेतू होता. त्यांच्या या विचाराशी त्या काळातील नेते सहमत होते." २

२६ जानेवारी १९५० मध्ये आपल्या देशाची घटना तयार केली व घटनेनुसार लोकशाही जीवन प्रणाली हे देशाच्या प्रशासनाचे तत्व मानले गेले. कोणताही देश केवळ एकसंध बनविण्यासाठी देशाची म्हणून भाषा असावी लागते. या देशातील अनेक प्रादेशिक भाषांचा विचार केल्यास असे दिसून येते की, कोणत्याही एका प्रादेशिक भाषेला देशव्यापी भाषेची जागा घेता येऊ शकणार नाही. केवळ हिंदी ही एकच भाषा सर्व देशातील लोकाना एकत्र आणू शकेल व राष्ट्रभाषेचे स्थान भूषवू शकेल. "बाहय भिन्नता और आंतरिक एकता यही भारतीय सांस्कृतिका एक मुख्य लक्षण माना जाता है। इसलिए हिंदी भाषा का प्रसार और प्रचार होने में तात्विक दृष्टीसे कुछ कठिनाइए नहीं चाहिए सांस्कृतिक दृष्टीसे हिंदी भाषा की रचना वाकविन्यास उपमादि अलंकार, मुहावरे, शब्दकोष इ. हमें परकीय जैसे नही लगते, अंग्रेजीके बारेमें या किसी दुसरी परभाषाके बारेमें हम यह नहीं कह सकते हिंदी हिंदीकी हिंदीयोंकी भाषा है। वह संस्कृत जन्य और संस्कृत पृष्ठ है." ३ आज भारतातील १५ करोड लोक हिंदी भाषा बोलू शकतात त्यावरून तिचे महत्व स्पष्ट होते. हिंदी भाषेची पृष्ठभूमी संस्कृत आहे.

भाषिक भिन्नता असूनही लिपीच्या बाबतीत या भाषेची लिपी देवनागरी आहे. त्यामुळे ही भाषा लिहण्यास सुलभ वाटते.

१.३ महाराष्ट्र व हिंदी भाषा -

महाराष्ट्र शासन हे अत्यंत पुरोगामी असल्याने डॉ. कोठारी आयोगाच्या अहवालातील त्रिभाषी सूत्राचा वापर व अंमलबजावणी महाराष्ट्राने तत्परतेने केली. किंबहुना महाराष्ट्रात हिंदी भाषेच्या अभ्यासाला यापूर्वी पासूनच प्रोत्साहन देण्यात

येऊ लागले. राष्ट्रभाषा सभा, पुणे व राष्ट्रभाषा सभा, वर्धा यांच्यावतीने विद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी विविध परीक्षांचे आयोजन महाराष्ट्रात होऊ लागले. त्यामुळे अहिंदी राज्यात हिंदीचा जोमाने प्रचार करणारे महाराष्ट्र हे एक अग्रेसर राष्ट्र आहे. गेल्या २५ वर्षांत महाराष्ट्रात विविध शैक्षणिक व्यवसायांची अंमलबजावणी करण्यात आली त्यामुळे महाराष्ट्रातील शैक्षणिक चित्र इतर राज्याहून खूपच वेगळे दिसून येते. महाराष्ट्रातील उच्च प्राथमिक विद्यालयात व माध्यमिक विद्यालयात इयत्ता ५ वी पासून हिंदीच्या अध्यापनास सुरवात होते. विद्यार्थ्यांचे हे अध्ययन महाराष्ट्रातील ग्रामीण भागात योग्य पध्दतीने होण्यास अनेक अडचणी येतात तरीपण राष्ट्रभाषेचा प्रसार व प्रचार राष्ट्रभाषा प्रचार संस्था मोठया जोमाने करीत असल्याचे दिसून येते.

## १.४ हिंदी भाषेच्या अभ्यासाचे महत्व –

आज देशभर मूल्यांची घसरण चालू आहे. परस्परातील संघर्ष पराकोटीला जात आहेत. राज्याराज्यात सीमातंटे व भाषिक वाद सुरु आहेत आणि एकंदरीत या देशाचे एकसंधचित्र ठिसूळ बनत आहे. या खंडप्राय देशाला एकत्र बांधून ठेवण्यासाठी भाषा हे एक साधन आहे आणि म्हणूनच राष्ट्रभाषा हिंदीचा उपयोग याकामी सर्व जाणकारांनी करून घेतला पाहिजे. भारताबाहेर देखील हिंदी भाषेचा प्रसार होताना दिसून येतो. तसेच देशांतर प्रवासी भाषा म्हणून हिंदी भाषा बोलली जाते. राज्याराज्यात सलोखा नांदावा म्हणून राज्यानी हिंदी भाषेच्या अभ्यासाचा पुरस्कार हिरीरीने केला पाहिजे. हिंदी हटाव, इंग्रजी हटाव अशा मोहिमेने या देशाचे प्रचंड नुकसान होत आहे. यापुढे होणारे नुकसान आपण टाळू शकू. मात्र यासाठी या देशाची म्हणून राष्ट्रभाषा हिंदी आहे तिचा अभ्यास सर्व राज्यानी केला पाहिजे. सर्व राज्याने हिंदी भाषेचा स्वेच्छेने स्विकार केल्यास भिन्नतेतून एकात्मकता साधता येईल आणि या एकात्मकतेसाठी व आंतर राष्ट्रीय सामंजस्यासाठी हिंदी भाषेचा अभ्यास, प्रसार वप्रचार होणे आवश्यक आहे.

तसे पाहिले तर हिंदी व मातृभाषा मराठी यांच्यात खूपच साम्य आहे. भाषेची लिपी समान आहे, लिहण्याची पध्दत सारखी आहे आणि भाषेच्या रचनेतही खूपच साधर्म्य आहे. त्यामुळे ती बोलणाऱ्या व्यक्तीमध्ये एकात्मकतेची भावना निर्माण होते. प्रादेशिक भाषा व राष्ट्रभाषा यांच्या बाबतीतही हे विधान लागू पडते, कारण प्रादेशिक व राष्ट्रीय एकात्मकता निर्माण करण्याची भाषा एक परिणामकारक साधन आहे. त्या एकात्मकतेच्या दृष्टीकोनातून निरनिराळ्या भारतीय भाषांच्या अभ्यासाची अंतरभारती नामक योजना कै. सानेगुरूजी यानी मांडली व त्यातूनच एकराष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करण्यासाठी व वाढविण्यासाठी राष्ट्रभाषा हिंदीच्या अभ्यासावर आज आपल्या देशात व शिक्षण पध्दतीत अधिक भर दिला जात आहे. यापुढे जगातील विभिन्न भाषाचा मानवी दृष्टीकोनातून अभ्यास करण्यात यावा व हिंदी भाषेला त्यात प्राधान्य असावे असे मानले जाऊ लागले. हिंदी भाषेच्या माध्यमातून या देशाच्या विचार परंपरांचा व संस्कृतीचा तसेच जीवन मूल्यांचा परिचय करून देता येईल. महाराष्ट्रापुरते बोलावयाचे झाल्यास मातृभाषा मराठी व राष्ट्रभाषा हिंदी या दोन्ही भाषांचा विकास परोपरीने होऊ शकेल आणि याकरिताच हिंदी भाषेच्या अभ्यासाला विशेष महत्व देणे आवश्यक आहे.

१.५ हिंदी भाषेच्या अभ्यासाची गरज -

भारत या खंडप्राय देशाच्या भाषिक धोरणांचा साकल्याने विचार करून भाषिक धोरणाबद्दल एक ठाम व ठोस भूमिका कोठारी आयोगाने घेतलेली आढळून येते. कोठारी आयोगाच्या अहवालात त्रिभाषा सूत्रावर सविस्तर माहिती आली आहे. त्यामुळे सर्व प्रांतानी राष्ट्रभाषा म्हणून जरी प्रादेशिक भाषेला आग्रक्रम दिला तरी हिंदी ही या देशाची राष्ट्रभाषा म्हणून स्विकारावी अशी शिफारस या अहवालाने केली आहे. यावरून हिंदी भाषेचे महत्व स्पष्ट होते. संविधानातील ३५१ कलमानुसार हिंदीला राष्ट्रभाषा म्हणून घोषित करताना तिला दिलेले अनन्य साधारण महत्व

लक्षात येते. "हिंदी भाषाके प्रसार की वृध्दी करना उसका विकास करना ताकी वह सामाजिक संस्कृतीके सभी तत्वोंकी अभिव्यक्तीका माध्यम हो सके तथा उसकी आत्मीकतासे हस्तक्षेप किया बिना हिंदुस्थानी और अष्ट अनुसूचिमें उल्लिखीत अन्य भाषाओंके स्पशैली और पदावली को आत्मसात करते हुए जहाँ आवश्यक हो वहाँ उसके शब्द भांडार के लिए मुख्यत: संस्कृतसे तथा गौणत: अन्यभाषाओंके शब्द ग्रहण करते हुए उसकी समृध्दी करना संघका कर्तव्य होगा।" ४ राष्ट्रभाषा म्हणून हिंदी भाषेला मानाचे स्थान मिळाले, नंतर शालेय अध्यापनात या भाषेला अग्रक्रम देण्यात आला आणि तिचे स्वरुप खालील प्रमाणे ठरले. "विभिन्न राज्योंके माध्यमिक शिक्षालयोंमे हिंदीको स्थान दिया गया है " और महाराष्ट्र, गुजरात आदि राज्योंने तो माध्यमिक शिक्षालयोंमे हिंदीको पाँचवी कक्षासे ग्यारहवी कक्षातक अनिवार्य बनाया है।" ५ यावरून शालेय अध्यापनात हिंदी भाषेला अग्रक्रम देण्यात आल्याचे दिसून येते. हिंदी टिचिंग कमिटीने इयत्ता ५ वी पासून शालांत परीक्षेपर्यन्त हिंदी भाषेचे शिक्षण आवश्यक मानले आहे. कमिटीच्या अहवालानुसार ज्या विद्यार्थ्यांची मातृभाषा हिंदी आहे, अशा विद्यार्थ्यांचा स्तर हा अहिंदी प्रदेशातील हिंदी ज्ञानाच्या स्तरापेक्षा वेगळा असेल हे मान्य केले आहे.

". . . . . The student after passing Standard XI should be well drilled in common Hindi and should be able to discharge his responsibilities, as a future citizen of the Indian Union in a satisfactory manner. He should have acquired the ability and facility to express himself both in speech and in writing on all questions of public interest, as would come up, for instance, in the legislature of the country - both central and State - he should be able to follow the programme relayed by the All India Radio in Common Hindi. All official orders or proclamations,

notifications, etc. issued in common Hindi should be easily understood by him, news paper articles and news items, speeches of public men and the like given in Common Hindi, he should be able to follow intellgently. Thus the whole aim of learning and teaching Hindi as a common language will be more practical and utilitarian than literary". ६

हिंदी टिचिंग कमिटीच्या वरील अहवालानुसार माध्यमिक शाळेतील हिंदी अध्यापनाचे महत्व स्पष्ट होते व माध्यमिक शाळेतील हिंदी अध्यापनाचा दृष्टीकोन विशुध्द व्यावहारीक व उपयोक्तवादी असला पाहिजे. हेही स्पष्ट होते. म्हणूनच महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक मंडळाने सदर अहवालाचा उपयोग करून इयत्ता ८ वी च्या अभ्यासक्रमाची रचना केलेली आहे. तरी देखील भाषिक उद्दीष्टाच्या पातळीवर विचार केल्यास सर्वसाधारणपणे हिंदी भाषा समजण्याची शक्ती विद्यार्थ्यांमध्ये फारच कमी प्रमाणात दिसून येते. त्यांची शब्द संपदा तोटकी असते. तसेच त्यांच्या विचार शक्तीचा व आकलन शक्तीचा विकास फारसा झालेला दिसून येत नाही. इ. गोष्टीच्या उणिवा हिंदी भाषा आत्मसात होताना दिसून आल्यामुळे संशोधकाने खालील विषय आपल्या शोधं निबंधाकरिता निवडला आहे.

१.६ संशोधनाचा विषय -

"बार्शी तालुक्यातील माध्यमिक शाळांतील इयत्ता ८ वी च्या हिंदी अध्यापनाचा चिकित्सक अभ्यास".

संशोधनाची उद्दीष्टे -

१) माध्यमिक शाळातील हिंदी अध्यापनाच्या सुविधांचा अभ्यास करणे.

२) हिंदी अध्यापन करणाऱ्या शिक्षकांच्या व्यावसायिक तयारीचा अभ्यास करणे.

३) हिंदी भाषेच्या अध्यापनासाठी उपयोगात आणीली जात असलेली तंत्र व पध्दती यांचा अभ्यास करणे.

४) हिंदी अध्यापन सुधारण्यासाठी शिफारसी करणे.

१.७ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा -

वरील उद्दीष्टे समोर ठेवून या शोध निबंधाचे संशोधन क्षेत्र बार्शी तालुक्यापुरते मर्यादीत केले आहे. कारण संशोधक, हा बार्शी येथील "शिक्षण महाविद्यालयात" गेली १५ वर्षे अध्यापनाचे कार्य करीत आहे. तसेच संशोधकाचे मार्गदर्शक देखील बार्शी येथील शिक्षण महाविद्यालयातील प्राचार्य आहेत. त्यामुळे मार्गदर्शकाची भेट घेणे, चर्चा करणे, संशोधकास आवश्यक वाटणाऱ्या सर्व गोष्टीची मदत सहजा सहजी मिळण्यास सोयीचा भाग म्हणून संशोधकाने आपल्या संशोधनाची व्याप्ती बार्शी तालुक्यापुरती मर्यादीत ठेवली आहे. शिक्षण महाविद्यालयात काम करीत असताना संशोधकाला बार्शी शहर व तालुक्यातील उच्च प्राथमिक माध्यमिक शाळांशी व त्यातील शिक्षकांशी अनेक वेळा विविध कारणानी संपर्क आला. उदा. शिबीरे, चर्चासत्र इ. यातूनच संशोधकाला प्रस्तुत विषय अध्यापनाच्या बाबतीत वाटणाऱ्या असमाधानातून सदर तालुका शोध निबंधाकरिता निवडला आहे. बार्शी तालुका हा तसा ग्रामीण तालुका असून बार्शी शहर व परिसरात असलेल्या एकूण ३० शाळांचा अभ्यास संशोधकाने केला आहे.

या विषयाच्या अध्यापनासाठी त्या त्या शाळेत उपलब्ध असणाऱ्या शैक्षणिक सुविधा उपयोगात आणल्या जात असणाऱ्या पध्दतीचा शिक्षकांच्या व्यावसायिक तयारीचा तसेच अध्यापनाचे तंत्र व पध्दती विद्यार्थ्यांना अध्यापनाची गोडी लावू शकतात. या गोष्टीचा गेली अनेक वर्षे विचार करून पाठनिरीक्षणाच्या वेळी भेडसावणाऱ्या विविध समस्यांची उकल करण्यासाठी प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी बार्शी

तालुक्याची निवड संशोधकाने केली आहे. व सदर विषयाचा मागोवा घेण्यासाठी संशोधनातील सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला आहे. या सर्वेक्षणात या तालुक्यातील ग्रामीण व शहरी शाळांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे बार्शी तालुक्यातील हिंदी अध्ययन अध्यापना-च्या सद्य:स्थितीचे चित्र समजण्यास मदत झाली आहे.

संदर्भ


१) कुंडले म. बा., मराठीचे अध्यापन,
विद्याप्रकाशन, शनिवार पेठ,
पुणे, १९७४, पृष्ठ - १.

२) राष्ट्रवाणी, संपादक : महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा,
३८८, पो. बॉ. नं. ५६०, पूना - २ (महाराष्ट्र) १९७०, पृष्ठे १४, १५

३) डॉ. जोगळेकर न. चि., डॉ. तिवारी भगवानदास,
राष्ट्रभाषा विचार संग्रह, अनाथ विद्यार्थी गृह,
१७८६ सदाशिव पेठ, पुणे २, १९६४, पृष्ठ २२.

४) केणी सज्जनराम, कुलकर्णी हरीकृष्ण,
हिन्दी की अध्यापन पद्धति,
व्हिनस प्रकाशन, पुणे, १९७३, पृष्ठ ३२.

५) राष्ट्रभाषा पत्र, उत्कल प्रांतिय राष्ट्रभाषा प्रचार सभा,
राष्ट्रभाषा रोड, कटक, १ (ओडीसा), १९६०, पृष्ट १०.

6) **Report of the Hindi Teaching Committee (Bombay State), 1756, Pp.4.**